REGISTERED No. B. 3434




# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख १६ एप्रिल १९४७ अंक १६


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे ऑफिसः

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ६,७७,३७० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ५८,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे
मॅ. डायरेक्टर

## लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें
## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर (बुधगांव) एम्. एस्. एम्. रेल्वे

—यांचे—

| नांगर | चरक |
|---|---|
| किसान नं. १०१ (सहा ते आठ बैली) | विश्वास (चार बैली) |
| किसान नं. १०२ (चार ते सहा बैली) | वासुदेव (दोन बैली) |
| किसान नं. १०५ (दोन ते चार बैली) | राजा (एक बैली) |

'मधुकर' (सात फण्याचे) कोळपें (दोन बैली)

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

## विविध माहिती

**अरबस्थानांतील तेल**—अरेबिअन-अमेरिकन तेल कंपनीनें तेल उपसा वाढविण्यासाठी २२ कोटी, ७० लाख डॉलर्स खर्च येणारी एक योजना आखली आहे. या योजनेंत पर्शिआच्य आखातावर एक मोठें बंदर, तेथपर्यंत रेल्वे-रस्ता व १,०५० मैल लांबीचे तेलाचे नळ घालून पूर्व भूमध्य समुद्रापर्यंत तेल नेण्याची सोय यांचा अंतर्भाव होतो.

**हिंदुस्थान अमेरिका व्यापार**—१९४६ सालीं अमेरिकेंत हिंदुस्थानांतून २३ कोटी, ७६ लाख, ६४ हजार डॉलर्स किंमतीचा माल आयात झाला. १९४५ सालीं हाच आकडा १७ कोटी, ३१ लाख, ५७ हजार असा होता. उलट, अमेरिकेच्या हिंदुस्थानांत आलेल्या मालाची किंमत ४९ कोटी, १२ लाख, ५१ हजार डॉलर्स पासून १८ कोटी, १० लाख डॉलर्सपर्यंत घसरली.

**हवामान तज्ञांची परिषद**—वॉशिंग्टन येथें २२ सप्टेंबर १९४७ ते ७ आक्टोबर १९४७ पर्यंत हवामान-तज्ञांची एक आंतरराष्ट्रीय परिषद भरणार आहे. सदर परिषदेला अमेरिकेनें परराष्ट्रांच्या प्रतिनिधींना आमंत्रण केलें आहे. हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनाही आमंत्रण आहे.

**कोळशाच्या बदली माणसें**—फ्रान्स व इटली यांच्यांत एक करार झाला असून त्यांतील अटीप्रमाणें २ लाख इटालिअन कामगार फ्रान्समध्यें स्थलांतर करणार आहेत. याच्या बदला इटलीला ह्या दर माणसामागें दर दिवशीं ३ हंड्रेडवेट कोळसा मिळणार आहे.

**पोलादाच्या उत्पादनांत वाढ**—पोलादाचे कारखानदार आणि कामगार यांच्यांत झालेल्या करारामुळें इंग्लंडच्या पोलादाच्या उत्पादनांत ७ लाख,५० हजार टन वाढ होईल असा अंदाज आहे.

**सीमेंटच्या किंमतींत वाढ**—सीमेंटची किंमत ६० रु. टनाऐवजी ६५ रुपये टन ठेवण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ही माहिती मध्यवर्ती विधिमंडळांत उद्योग खात्यातर्फे देण्यांत आली.

**कोळसा खाणीसंबंधीं चौकशी**—हिंदुस्थान सरकारतर्फे नेमण्यांत येणाऱ्या कोळशाच्या खाणीसंबंधीं चौकशी कमिटीवर सरकारी अधिकारी असतील, त्यांत मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें व संस्थानें यांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. कामगारांचे चार प्रतिनिधी समितीवर घेतले जातील.

**हैद्राबाद विमानक्लब**—दक्षिण हैद्राबादेंतील विमान क्लब आतां पुन्हा सुरू होणार आहे. युद्धकालांत हा क्लब बंद करण्यांत आला होता. क्लबाला कायमची २५ हजाराची व दरवर्षी ४० हजाराची मदत संस्थानकडून मिळणार आहे. विमानतळ बेगम पेठ येथें राहील.

**इराणला अमेरिकन शस्त्रास्त्रें**—अंतर्गत शांतता राखण्यासाठी इराण सरकारला अमेरिका आपल्याजवळील शिलकी शस्त्र-सामुग्री देण्याचा विचार करीत आहे.

**सहकारी बँकांचें महत्त्व**—सुरत पीपल्स को. बँकेचा रौप्य महोत्सव ता. ३१ मार्च रोजीं मुंबई सरकारचे अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्यावेळीं शहरी लोकांच्या जीवनांतील सहकारी बँकांच्या स्थानाचें महत्त्व त्यांनीं आपल्या भाषणांत वर्णन करून सांगितलें.

**६,००० मल्टि पर्पज सोसायट्या**—संयुक्त प्रांतांत ६,००० विविध कार्यकारी सोसायट्या स्थापन करण्याचा तेथील सरकारचा विचार आहे. अन्न व दूध ह्यांचा पुरवठा वाढावा आणि सूत व कापड ह्यांचें उत्पादन सुधारावें हा त्याचा उद्देश आहे.

**बार्कलेज बँकेचे यशस्वी चेअरमन**—बार्कलेज बँकेचे चेअरमन, मि. एडविन फिशर हे आपल्या वयाच्या ६३ व्या वर्षी लंडन येथें नुकतेच निवर्तले. १९०८ सालीं त्यांनीं असिस्टंट सेक्रेटरी ह्या नात्यानें बँकेंत प्रवेश केला. ते तीन वर्षांनीं बँकेचे सेक्रेटरी झाले तेव्हां त्यांचें वय ३० वर्षें सुद्धां नव्हतें.१९२० सालीं बर्मिंगहॅमचे ते लोकल डायरेक्टर झाले. १९२५ सालीं ते बँकेच्या मुख्य कचेरींत जनरल मॅनेजर म्हणून परत आले.१९३२ सालीं त्यांची डायरेक्टर बोर्डावर निवडणूक होऊन व्हाईस चेअरमनचे जागीं नेमणूक झाली. १९३४ सालीं ते डेप्युटि चेअरमन झाले आणि १९३६ सालापासून मृत्यूपर्यंत ते बँकेचे चेअरमन होते. युद्धकाळांत ब्रिटिश बँकिंग योग्य वळणानें यशस्वी रीतीनें नेण्यास त्यांनीं चांगला हातभार लावला होता. बार्कलेज बँक ही पांच प्रमुख ब्रिटिश बँकांतील बँक आहे.

**वचावलेल्या वैमानिकांची संस्था**—युद्धकाळांत ज्यांचीं विमानें खालीं पाडण्यांत आलीं असतांहि जे इतरांच्या मदतीनें बचावले, अशा रॉयल एअर फोर्समधील वैमानिकांची एक "एस्केपिंग सोसायटी" ग्रेट ब्रिटनमध्यें स्थापन झाली आहे. असे वैमानिक व त्यांचा ज्यांनीं बचाव केला ते सहायक, हे सर्व सोसायटीचे सभासद होतील.

**अमेरिकन व ब्रिटिश चित्रपट**—अमेरिकन चित्रपट ग्रेट ब्रिटनमध्यें दाखविण्यांत येतात, त्यांना अमेरिकेंत दाखविल्या जाणाऱ्या ब्रिटिश चित्रपटांचे मानानें किमान दहा ते वीस पट उत्पन्न मिळतें. ही परिस्थिति सुधारली पाहिजे, असें सर स्टॅफर्ड क्रिप्स, ब्रिटिश व्यापार खात्याचे मंत्री, हे नुकतेच म्हणाले.

**हजार रुपयेवाल्या चलनी नोटा**—१४ मार्च १९४७ अखेर एकूण १,१२,४१,९९,००० रुपये किंमतीच्या हजार रुपयेवाल्या नोटांचे बदली दुसऱ्या नोटा देण्यांत आल्या.

**ए. बी. सी. बँकेंतील २७ लाखांची ठेव**—गेल्या वर्षी आगाखानांची हीरक तुला करण्यांत आली त्यांतील हिऱ्यांच्या किंमतीचे २७ लक्ष रुपये "ए. बी. सी." बँकेंत ठेवण्यांत आले होते, असें वृत्त प्रसिद्ध झालें आहे.

**म्हैसुर सिल्क फिलेचर्स लि.**—वरील कंपनीच्या भागीदारांस १९४६ अखेरच्या वर्षासाठी १२½% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनी प्रत्येकीं १० रुपयाचे ४०,००० नवे शेअर्स विक्रीस काढणार आहे. प्रत्येक शेअरमागें ४ रु. वाढावा घेण्यांत येणार आहे.

**ट्राम-बसमध्यें सापडलेल्या जिनसा**—लंडन शहरांतील वहातुक कंपनीच्या वहानांत १९४६ सालीं २,७७,००० जिनसा उतारू विसरून गेले. त्यांपैकी ३४,००० छत्र्या होत्या.

**ए. बी. सी. बँकेच्या कारभाराची नवी व्यवस्था**—असोसिएटेड बँकिंग कॉर्पोरेशननें हायकोर्टाकडे केलेल्या अर्जाचा निकाल गेल्या आठवड्यांत लागला. ऑडिटर श्री. एन. एम. रायजी ह्यांना बँकेचे सेक्रेटरी व मॅनेजर नेमण्यास बँकेनें संमति दिली. त्यांनीं बँकेच्या घेणेकऱ्यांच्या सहकार्यानें काम करावयाचें आहे. २१ जून रोजीं बँकेच्या घेणेकऱ्यांची एक व भागीदारांची एक अशा स्वतंत्र सभा भरविल्या जातील, त्यांनीं बँकेच्या नव्या व्यवस्थेस मान्यता द्यावयाची आहे. त्या तारखेपर्यंत बँकेविरुद्ध असलेले (लिक्विडेशन वगळून) सर्व दावे स्थगित ठेवले जातील. घेणेकऱ्यांच्या व भागीदारांच्या सभेचे अध्यक्षस्थानीं हायकोर्टाचा प्रोथोनोटरी हा बसेल.

# अर्थ

बुधवार, ता. १६ एप्रिल, १९४७





संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.

प्रा. वा. गो. काळे


## बँकिंग बिलावरील सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट

हिंदी बँकिंग कंपन्यांबाबत बिलावरील सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट सरकारी गॅझिटांत नुकताच प्रसिद्ध झाला आहे. बँकिंगचा धंदा करणाऱ्या व्यक्ती व पेढ्या ह्यांसहि बँकिंग बिल लागू व्हावें अशी सिलेक्ट कमिटीनें इच्छा व्यक्त केली आहे; परंतु असें करण्यांत घटनाविषयक अनेक अडचणी आहेत, असें सिलेक्ट कमिटीला सांगण्यांत आलें. मूळ बिलांत सिलेक्ट कमिटीनें कित्येक दुरुस्त्या व सुधारणा केल्या आहेत आणि दुरुस्त केलेलें हें बिल आतां मध्यवर्ती विधिमंडळांत त्यांच्या येत्या अधिवेशनांत चर्चेस निघेल. सिलेक्ट कमिटीनें बिलांत केलेल्या महत्त्वाच्या फेरफारांचा परामर्श येथें घेतला आहे.

बँकिंग कंपन्यांची व्यवस्था मॅनेजिंग एजंटाकडे किंवा ज्याचें वेतन कमिशन अथवा नफ्यांत भागीदारी ह्या स्वरूपाचें आहे अशाकडे असूं नये, हें मूळ बिलांत सांगितलेंच आहे. कंपनीच्या आर्थिक परिस्थितीचे मानानें मॅनेजरचा पगार भरसमाट असूं नये, असेंहि ठरविण्यांत आलेलें आहे. बँकेच्या नोकरांनीं आपला सर्व वेळ बँकेसाठीच खर्च करावा; इतर उद्योगधंद्यांत त्यांनीं पडूं नये, ह्या धोरणानें सिलेक्ट कमिटीनें बिलाची मूळ योजना आणखी कडक केली आहे, तिचे अन्वयें बँकेच्या कोणत्याहि नोकरास दुसऱ्या कंपनीचा डायरेक्टर रहातां येणार नाहीं; किंवा दुसऱ्या व्यवसायांत लक्ष घालतां येणार नाहीं. मॅनेजर व बँक ह्यांचेमधील कराराची पांच वर्षांची मुदत सिलेक्ट कमिटीनें कायम ठेवली आहे; परंतु करार पुनः वाढविण्याचा असल्यास त्याला शेअर-होल्डरांच्या साधारण सभेची मान्यता आवश्यक करण्यांत आली आहे. बँकेच्या परिस्थितीच्या मानानें मॅनेजरचा पगार भरमसाट आहे किंवा नाहीं ह्याविषयीं प्रश्न उपस्थित झाल्यास त्याबाबत रिझर्व्ह बँकेचा निर्णय अखेरचा समजावा लागेल.

बँकांच्या किमान भांडवलाविषयीं सिलेक्ट कमिटीनें केलेल्या सूचना मागेंच प्रसिद्ध झाल्या आहेत; आणि त्या समाधानकारक अशाच आहेत. एकच कचेरी असणाऱ्या बँकेस ५० हजारांचें शेअर भांडवल व रिझर्व्ह पुरें असावें, अशी कमिटीची शिफारस आहे. मूळ बिलांत ही रकम १ लक्ष रुपये होती. भांडवलविषयक अटी पार पाडण्यास बँकांना आणखी एका वर्षाची, म्हणजे एकूण तीन वर्षांची मुदत आतां देण्यांत आली आहे. हिंदी संस्थानांना मूळ कायद्यानें परकीय देशासारखें लेखलें होतें, परंतु सध्याचा ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें ह्यांचेमध्यें परस्पर सोईचे संबंध दृढतर व्हावे ह्या दृष्टीनें, संस्थानांत स्थापन झालेल्या बँकांनीं किमान आवश्यक भांडवलाची रकम रिझर्व्ह बँकेंत कायम ठेवावी ही अट सिलेक्ट कमिटीनें रद्द केली आहे.

भागीदारानें भरणा केलेल्या भांडवलाच्या प्रमाणांत त्यास मताधिकार असावा, असें मूळ बिलाचें कलम सांगतें. तथापि, कांहीं गटांच्या हातांत बँकांचीं सूत्रें जाऊं नयेत, ह्या दृष्टीनें मताधिकारावर नियंत्रण घालणें सिलेक्ट कमिटीस आवश्यक वाटलें. एकूण मतांच्या १०% पेक्षा मतें कोणाहि एका भागीदारास देतां येणार नाहींत, अशी दुरुस्ती कमिटीनें केली आहे.

बँका डिव्हिडंड वांटण्याची घाई करतात त्यास आळा घालण्यासाठीं सिलेक्ट कमिटीनें एक नवें कलम बिलांत दाखल केलें आहे. प्राथमिक खर्च, ऑर्गनायझेशन खर्च, शेअर विक्रीवरील कमिशन, आलेला तोटा, इत्यादि बाबी ताळेबंदांतून नाहींशा झाल्याविना डिव्हिडंड वाटणें आतां बँकांना शक्य होणार नाहीं. एकाच मनुष्यास दोन बँकांचे डायरेक्टर रहाण्यास बंदी असावी, अशी सिलेक्ट कमिटीची शिफारस आहे; त्यांत ब्रिटिश व संस्थानांतील बँक असा भेद करण्यांत आलेला नाहीं. प्रत्येक बँकेनें नफ्यापैकी २०% रकम रिझर्व फंडांत टाकली पाहिजे, असें मूळ बिल सांगतें. परंतु शेड्यूल्ड बँका त्यांतून वगळण्यांत आल्या होत्या. मोठ्या बँकांना तर मोठा रिझर्व फंड पाहिजे, ह्या दृष्टीनें आतां रिझर्व फंडाची अट शेड्यूल्ड बँकांनाहि लागू करण्यांत आली आहे. बिगर शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व बँकेकडे रोख रकम ठेवावयाची, ती शेड्यूल्ड बँकापेक्षां कमी प्रमाणांत असण्याचें प्रयोजन नाहीं, ह्या दृष्टीनें रिझर्व बँक कायद्यांतील २% व ५% हीं प्रमाणेंच सर्व बँकांना लागू करण्यांत यावयाचीं आहेत.

कोणत्याहि बँकिंग कंपनीनें आपल्या डायरेक्टरांस किंवा ज्या कंपन्या किंवा फर्म्स ह्यांचेमध्यें अशा डायरेक्टरांचे हितसंबंध आहेत अशा कंपन्यांना व फर्म्सना विना-तारण कर्जें देऊं नयेत, अशी बिलांत तरतूद आहे. अनिष्ट कर्जांस पायबंद घालणारी ही योजना फारच व्यापक झाली, हें सिलेक्ट कमिटीस पटलें व पब्लिक कंपन्यांपुरती सूट देण्यास सिलेक्ट कमिटी तयार आहे. तथापि अशा पब्लिक कंपन्यांस दिलेल्या विना-तारण कर्जांचा तपशील बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे दरमहा पाठविला पाहिजे, अशी अट कमिटीनें घातली आहे. अशा कांहीं कर्जांत ठेवीदारांना धोका आहे, असें रिझर्व्ह बँकेस आढळलें, तर तीं कर्जें बंद करण्याचा व कर्जांची वसुली करण्यास बँकांना हुकूम करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस देण्यांत यावयाचा आहे.

## बँकांमधील नोकर वर्गाची दाद लागली

मुंबईतील बँकांच्या नोकरांचें फेडरेशन आणि मुंबईतील तीस लहान-मोठ्या बँका यांच्यांत गेले कांहीं महिने तेढ उत्पन्न होऊन कांहीं बँकांतून संपापर्यंतहि मजल गेली होती. कारकून आणि संप हे दोन शब्द अगर कल्पना एकत्र नांदूं शकत नाहींत अशीच सर्वसाधारण समजूत होती आणि ती अगदींच चुकीची होती असेंहि म्हणतां येणार नाहीं. तथापि दुसऱ्या महायुद्धामुळें ज्या अनेक नवीन घटना घडून आल्या त्यांतच मध्यमवर्गीय नोकरपेशा वर्गाची जागृति हीहि एक अतर्क्य वाटणारी घटना घडून आली. बँकेंतील अगर इतर ठिकाणच्या कारकून वर्गाला पूर्णार्थानें कामगार म्हणतां येणार नाहीं हें खरें, परंतु श्रमशक्ति विकल्याखेरीज जीवनाचें अन्य साधन ज्याच्या जवळ नाहीं तो कामगार अशी व्याख्या केल्यास कारकून वर्गहि कामगार वर्गांतच मोडला

जाईल. कोणत्याहि देशांतील अर्थव्यवस्था आधुनिक तऱ्हेची होऊं लागली कीं बँका, विमा कंपन्या, पतपेढ्या यासारख्या पैशाच्या उलाढाली करणाऱ्या संस्थांना मूलग्राही उद्योगधंद्याइतकेंच महत्त्वाचें स्थान प्राप्त होतें. अर्थातच या संस्थांतील नोकर वर्ग आणि चालक यांच्यांतील संबंध सलोख्याचे, निदान धंदेवाईक सहकार्याचे, असणें अत्यंत जरूर आहे.

या दृष्टीनें विचार करतां औद्योगिक कलहांच्या लवाद मंडळाचे अध्यक्ष सर हरसिद्धभाई दिवाटिआ यांनीं दिलेला निर्णय बँकांतील कारकून आणि बँकांचे चालक या दोन्ही पक्षांना मान्य होण्यासारखा आहे. मुंबईतील बँकांच्या कारकून वर्गाची मुख्य तक्रार सुरवातीचा पगार, त्यांत होणारी वाढ व महागाई भत्ता याविषयीं होती. फेडरेशनतर्फे प्रारंभी किमान पगार ७५ रु. असावा आणि तो २० वर्षांत ३०० रु. पर्यंत पोचावा अशी मागणी करण्यांत आली होती. लवादांच्या निर्णयानुसार मुंबईतील बारा प्रमुख बँकांतून किमान पगार ६५ रु. असावा आणि तो २५ वर्षांत २७५ रु. पर्यंत चढावा अशी शिफारस करण्यांत आलेली आहे. इतर १८ बँकांच्या बाबतींत किमान पगार ५५ रु. असावा आणि तो २२ ते २५ वर्षांच्या नोकरीनंतर २१२ ते २५० रु. पर्यंत वाढविला जावा अशी शिफारस करण्यांत आलेली आहे. बँकांतील कनिष्ठ नोकरवर्गाच्या बाबतीतही लवादांनीं दिलेला निर्णय एकंदरीनें समाधानकारक आहे. पगाराशिवाय नोकरीच्या इतर अटींबद्दलसुद्धां त्यांनीं प्रगतिकारक धोरण स्वीकारलेलें आहे. ज्या बँकांतून पेन्शन अगर प्रॉव्हिडंट फंडासारख्या योजना नसतील त्यांनीं १५ वर्षांच्या नोकरीनंतर ग्रॅच्युइटी द्यावी असें सुचविण्यांत आलेलें आहे. याशिवाय कचेरींत जेवणाकरितां खोलीची आणि पिण्याकरितां स्वच्छ पाण्याची सोयहि करण्यांत यावी अशी सूचना केलेली आहे. मोफत वैद्यकीय सल्ला, ३० वर्षे नोकरी झाल्यानंतर खुषीची सेवानिवृत्ति, वयाला ६० वर्षें पूर्ण झाल्यावर सक्तीची सेवानिवृत्ति इत्यादी शिफारसी मामुली असल्या तरी बँकेंतील कारभाराच्या दृष्टीनें योग्यच आहेत.

फेडरेशनतर्फे मांडण्यांत आलेल्या दोन मागण्या मात्र लवादांनीं अमान्य केल्या. बँकांतील कारकून वर्गाच्या संघटनेला मान्यता देणें हा प्रश्न औद्योगिक कलह–निवारण बिलाच्या अटी पाळण्यावर अवलंबून आहे. त्यामुळें ही मागणी फेटाळली गेली. बँकांतील अधिकाराच्या जागा दीर्घकाल नोकरी झालेल्या कारकुनांना द्याव्या ही फेडरेशनची मागणी निवाड्यांतील प्रश्नाच्या कक्षेबाहेरची असल्यानें अमान्य केली गेली.

## स्फुट विचार

### मि. हेन्री फोर्ड ह्यांचें निधन

जगप्रसिद्ध मोटार कारखानदार मि. हेन्री फोर्ड हे आपल्या वयाच्या ८४ व्या वर्षी ता. ७ रोजीं निधन पावले. मि. फोर्ड यांचे आईबाप १८४७ सालीं आयर्लंडमधून निघून अमेरिकेंत स्थाईक झाले. स्वतः मि. फोर्ड यांनीं वयाच्या सोळाव्या वर्षींच घरच्या शेतीला रामराम ठोकून डेट्राईट शहराची वाट धरली आणि दीर्घोद्योग, चिकाटी व साहस या गुणांच्या जोरावर ते पुढील आयुष्यांत जगप्रसिद्ध कारखानदार झाले. मजूर चळवळींविषयीं मि. फोर्ड यांचें अनुकूल मत नव्हतें. तथापि त्यांच्या कारखान्यांतून इतर कारखान्यांच्या मानानें पगार बरे असत. त्याचें कारण, भरपूर वेतनामुळें धंद्याची बरकत होते अशी त्यांची श्रद्धा होती. त्यांच्या औद्योगिक उत्कर्षाचा काळ हा अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या स्पर्धाप्रधान युगांत पडतो हे लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यानंतर म्हणजे गेल्या शतकाच्या अखेरी अखेरीस अमेरिकेंत मक्तेदार अर्थव्यवस्था उत्पन्न होऊन वाढीला लागली होती. खुद्द मि. फोर्ड यांनीं स्पर्धाप्रधान अर्थव्यवस्थेचा फायदा घेऊन आपल्या मालाची उत्पादनाची किंमत कमी करण्यांत चांगलें यश मिळविलें. त्यासाठीं काच कारखाने, कोळशांच्या खाणी, रेल्वेरस्ते, विजेचे कारखाने, इत्यादी कच्च्या मालाचीं व वहातुकीचीं साधनें त्यांना आपल्या मालकीचीं करावीं लागलीं. अर्थशास्त्रांच्या परिभाषेंत यालाच 'व्हर्टिकल कॉंबिनेशन' असें म्हणण्याचा प्रघात आहे. ज्या ठिकाणी बहिरे–मुके कामाला चालू शकत असतील तेथें फोर्ड तींच ठेवीत असें. अर्थात अशी माणसें कमी वेतनावर मिळूं शकतात हे उघडच आहे. शेअर बाजारासंबंधीं मि. फोर्ड यांनीं व्यक्त केलेलें मत त्यांच्यासारख्या औद्योगिक भांडवलदाराला साजेंसच आहे. "कांहीं चांगलीं माणसें या बाजारांत मार खातात आणि मग त्यांना काम करावें लागतें" असें ते म्हणत.

★ काटकसरीची आवश्यकता ! ★

संग्रही असलेला पैसाच हलीच्या बिकट व अनिश्चित काळांत उपयोगी पडेल. स्वतःचें व कुटुम्बाचें संरक्षण करावयास संग्रही पैसाच पाहिजे.

वेस्टर्न इंडिया

आपणांस या बाबतींत
सर्वतोपरी मार्गदर्शन करून साहाय्य देईल.
लिहा अगर भेटा
—मॅनेजरः—
वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.,
सातारा.

पुणें शाखा कचेरीः—कर्वे वाडा, लक्ष्मी पथ, बेलबाग.

# अमेरिकेंतील विमाविषयक कांहीं निवाडे

### गाफीलपणाचा भुर्दंड

एका विमेदारानें इच्छा प्रदर्शित केल्यावरून एका कंपनीच्या विमाएजंटानें त्याचे नांवाची एक विमापॉलिसी तयार करून आणली. विमेदार त्या एजंटास म्हणाला, "मीं असाच विमा उतरविण्याबद्दल दुसऱ्या एका विमाकंपनीकडे विचारणा केली आहे. त्यांचीहि अशीच पॉलिसी मजकडे येणार आहे. ती आली म्हणजे या दोन्ही पॉलिसींची मी तुलना करून पाहीन व मला जी सोयीची वाटेल ती स्वीकारीन; तेव्हां तुलना करून पहाण्यासाठी हा करार मजजवळच राहूं द्या." एजंटानें तें म्हणणें मान्य करून तो विमाकरार विमेदाराजवळ ठेवला आणि विस्मरणानें तो तसा ठेवल्याची पावती कांहीं घेतली नाहीं. नंतर कांहीं दिवसांनीं एजंट चौकशी करावयास आला तो विमेदार मृत्यू पावला होता व त्याची वारसदारीण विमाकराराचा तो मसुदा परत द्यावयास कबूल होईना. ती म्हणूं लागली कीं त्या कराराप्रमाणें मयताचा विमा उतरलेला असून विमारक्कम तिला मिळाली पाहिजे. शेवटीं प्रकरण कोर्टांत गेलें. त्या विम्याच्या करारपत्रांत असे शब्द होते कीं "विमेदाराचा अर्ज आल्यावरून व वार्षिक विमाहप्ता १८३ डॉलर्सचा आगाऊ भरावयाची अट मान्य झाल्यावरून हा विमाकरार विमेदारास करून दिला आहे." वारसदारीण म्हणूं लागली की ज्याअर्थी विमा करार विमेदाराच्या ताब्यांत आहे व ज्याअर्थीं विमाकरार केवळ तपासणीसाठी विमेदाराकडे दिला असें दाखविणारी पावती एजंटाला हजर करतां येत नाहीं, त्याअर्थीं विमा हप्त्याची रक्कम मयत विमेदारानें भरली असलीच पाहिजे हें निश्चित. शिवाय ती असेंहि म्हणूं लागली कीं सदर एजंट सुमारें १५ वर्षें याच कंपनीकडे विम्याचें काम करीत आहे. विमाकरार केवळ अवलोकनार्थ दिला तर त्याची पावती घ्यावयास पाहिजे, हा कंपनीचा नियम त्याला माहीत असावयास पाहिजे. असें असून तशी पावती त्यानें घेतलेली नाहीं. याचा अर्थच विमाकरार कायदेशीर रीत्या मयताला देण्यांत आलेला होता व म्हणून त्याची रक्कम तिला मिळालीच पाहिजे. परंतु पुढें प्रकरण अमेरिकेंतील न्यूयॉर्कच्या डिस्ट्रिक्ट कोर्टापुढें निघाल्यावर उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून विमाहप्त्याची रक्कम भरली गेलेली नाहीं असें कोर्टाचें मत पडलें व त्यामुळें एजंटानें विस्मरणानेंच करार पहावयास दिल्याची पावती घेतली नसावी असें कोर्टानें गृहीत धरलें व वारसदारिणीची विमा रकमेची मागणी अमान्य केली.


### चुकीच्या फायलींत नोंद

एका विमेदार सैनिकानें आपल्या विम्याचा वारसा आपल्या पत्नीस दिल्याचें नोंदविण्यासाठी अर्ज केला होता. परंतु सरकारदप्तरांत तो चुकीच्या फायलींत लावला जाऊन तो पाहावयास न मिळाल्याकारणानें दप्तरांत विमारक्कम त्या सैनिकाच्या बापाच्याच नांवावर राहिली होती. तेव्हां विमेदाराच्या पत्नीनें दावा लाविला. कॅलिफोर्निअच्या जिल्हाकोर्टानें बाईच्या बाजूचाच निकाल दिला व बापाचें नांव वारसाच्या जागेवरून काढून टाकलें.

### हप्ता टळला तरी विम्याची रक्कम मिळाली

एक अपघाताचा विमा उतरविला होता व त्याचे हप्ते दरमहिन्याला वेळच्या वेळीं १ तारखेस भरावयाचे होते. परंतु कंपनीचें दप्तर पाहतां विमाहप्ते मुदत संपून जाऊन कित्येक दिवसानंतर


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

हि भरलेले आढळत होते. विमा उतरल्याला सुमारें ५ वर्षें झालीं होतीं परंतु येवढ्या दीर्घ मुदतींत फक्त तीनच वेळां विमा हप्ते वेळच्या वेळीं भरण्यांत आले होते. चुकलेला हप्ता भरण्याबद्दल कंपनीनें लेखी विनंती एकवार तरी केली होतीच आणि सुमारें ३ ते २० दिवसांच्या उशीरानें सुद्धां कंपनीनें विमाहप्ता स्वीकारला होता. शेवटीं १ जुलै १९४२ ला विमाहप्ता भरावयाचा होता तो भरला गेला नाहीं आणि दुसऱ्याच दिवशीं विमेदार मृत्यु पावला. कंपनीनें विमा मुदतीबाहेर गेला असें म्हणून रकम देण्याचें नाकारलें. परंतु कॅलिफोर्नियाच्या कोर्टानें कंपनीचें म्हणणें गैर ठरविलें. पूर्वीचा वरीलप्रमाणें इतिहास तर होताच, त्याशिवाय वरील विमेदाराच्या वारसानें कंपनीकडील दोन पत्रें हजर केलीं. तीं विमेदार मरण पावला असेल अशी कल्पना नसल्यामुळें कंपनीनें लिहिलीं असणें साहजिक आहे. त्या पत्रांत मुदत संपली असली तरी हप्ता द्या, आम्ही तुमचा विमाकरार चालू ठेवूं, अशीं आश्वासनें दिलीं होतीं. त्यावरून कोर्टानें निर्णय दिला कीं विमेदार मरण पावला तेव्हां विमाकरार रद्द झाला असें कांहीं कंपनीचें म्हणणें नव्हतें. यास्तव कंपनीनें विमारकम दिलीच पाहिजे असा कोर्टानें हुकूम दिला.

### वारसाच्या नांवांत बदल

एका विमेदारास फक्त एकच मुलगा होता. त्यानें तीन लग्नें केलीं पण एका मुलाशिवाय त्याला कोणी वारस उरलें नव्हतें. तो व्यसनी होता. स्त्री, मद्य आणि संगीत ह्यांच्या आधीन तो होऊन गेला होता. मृत्यूपूर्वी थोडेच दिवस आधी त्यानें आपल्या मृत्युपत्रांतील व विमाकरारांतील वारसाचें नांव बदलून टाकलें होतें. मुलाच्या नांवाऐवजीं वारस म्हणून त्यानें शेवटीं तो ज्या एका बाईबरोबर लग्न न करितांच रहात होता तिचें नांव दाखल केलें होतें. बापाच्या मृत्यूनंतर मुलाच्या दृष्टोत्पत्तीस ही गोष्ट आली. त्यानें ती गोष्ट अजिबात अमान्य करून सदरप्रमाणें वारसाचीं नांवें बदललीं तेव्हां आपल्या वडिलांचें मन ताळ्यावर नव्हतें म्हणून त्यांनीं वारसाच्या नांवांत केलेला हा फरक रद्द ठरवावा असा दावा मांडला. अमेरिकेंतील केन्टुकी कोर्टानें निर्णय दिला कीं प्रस्तुत प्रकरणीं नीतीचें वर्तन कोणतें व अनीतीचें कोणतें ह्याचा विचार अप्रस्तुत आहे; व वारसाचीं नांवें बदलतांना आपण आपल्या मुलाऐवजीं आपल्या ठेवलेल्या बाईला वारसा देत आहोंत या गोष्टीचें ज्ञान मयतास होतें असा पुरावा पुढें आलेला आहे. अशा स्थितींत मुलाचा वारसा बापानें हेतुपुरस्सर रद्द केला असेंच समजावयास पाहिजे व मिळकत बाईला मिळाली पाहिजे.

---

**कापडावरील नियंत्रण उठवा**—कापड व सूत यांच्यावरील नियंत्रण पूर्णपणें उठविण्याची व कागदावरील नियंत्रण ढिलें करण्याची मागणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे करण्यांत आली आहे.

**तांदुळाच्या पिकाचा अभ्यास**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व शेतीसमितीनें भात पिकविणाऱ्या व खाणाऱ्या देशांच्या प्रतिनिधींचा एक मेळावा येत्या मे महिन्यांत भरविण्याचें ठरविलें आहे. आठ देशांच्या प्रतिनिधींना बोलावण्यांत आलें असून त्यांत हिंदुस्थानही आहे. तांदुळाच्या उत्पादनाची वाढ आणि किंमतीची स्थिरता यांचा विचार मेळाव्यांत प्रामुख्यानें करण्यांत येणार आहे.

**हेन्री एफ्. ग्रॅडी यांची नेमणूक**—अमेरिकेचे हिंदुस्थानांतील वकील म्हणून मि. हेन्री एफ्. ग्रॅडी यांची नेमणूक झाली आहे. हिंदुस्थानाच्या औद्योगीकरणाविषयीं त्यांनीं केलेला युद्धकालीन अहवाल अद्याप अंधारांतच आहे.


# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | "Cencobank" | नं. ११ |

मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

दी
# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

*( कोल्हापूर येथें सन १९२६ सालीं स्थापन झालेली व भागिदारांची मर्यादित जबाबदारी असलेली.)*

एच्. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | ५,०६,५०० |
| भरलेलें | रु. | ५,५३,००० |
| रिझर्व्ह | रु. | ४,०५,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. २,००,००,००० हून अधिक

मुख्य कचेरी––बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी–कोल्हापूर.

शाखा : संस्थानांतीलः—(१) शाहुपुरी–कोल्हापूर, (२) गुजरी–कोल्हापूर, (३) जयसिंगपूर, (४) इचलकरंजी, (५) पेठ–वडगांव, (६) मलकापूर, (७) गडहिंग्लज. संस्थानाबाहेरीलः—(८) मुंबई, (९) निपाणी (-जि. बेळगांव)

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

★ मौल्यवान चीजवस्तु सुरक्षित ठेवणेसाठीं हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात––

व्ही. ए. सावंत, ॲ. मॅनेजर

## दि म्हैसूर ग्लास अँड एनामल वर्क्स लि.

### कंपनीच्या वार्षिक सभेंत अध्यक्षांचें भाषण

दि म्हैसूर ग्लास अँड एनामल वर्क्स लि. ची ८ वी वार्षिक साधारण सभा यशवंतपूर स्टेशननजीक कंपनीच्या काच कारखान्यांत रविवार ता. ६ एप्रिल १९४७ रोजीं कंपनीचे चेअरमन, लोकसेवासक्त रावबहादुर बी. के. गरुडाचार, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्या वेळीं ते आपल्या भाषणांत म्हणाले:—

"ह्या आठव्या वार्षिक साधारण सभेस मी आपलें सर्वांचें स्वागत करतों.

"अहवालाचे वर्षीं आपला कारखाना सुमारें १० महिने चालून त्यांत सुमारें ७,००,००० रुपये किंमतीचें काच सामान तयार झालें. गेल्या वर्षीं ६,५०,००० रुपये किंमतीचें उत्पादन झालें होतें. कोळशाच्या तुटवड्यामुळें एनामलिंग खातें चालू नव्हतें.

"वाढती मजुरी आणि साधनें व सर्पण ह्यांची महागाई ह्यांमुळें नफ्याचें प्रमाण मात्र उतरलें आहे. कच्च्या मालाचा पुरवठा आणि त्याची वहातुक अद्याप समाधानकारक नाहीं. रहाणीच्या खर्चाचें मानहि अद्याप फार वरच आहे. आपल्या देशांतील उत्पादनाचें प्रमाण कायम राखून स्पर्धेस यशस्वी रीतीनें टक्कर द्यावयाची असल्यास ह्या परिस्थितींत सुधारणा झाली पाहिजे. सर्व तऱ्हेचा माल—काच सामान सुद्धां—आपल्या देशाकडे निर्गत करून आपला युद्धजन्य कर्जबाजारीपणा कमी करण्याचा प्रयत्न ग्रेट ब्रिटनसारखीं राष्ट्रें कसून करीत आहेत. आपण त्यास तोंड देण्यास विलंब केला तर आपण मागें पडल्याखेरीज रहाणार नाहीं.

"कंपनीची आर्थिक परिस्थिति समाधानकारक आहे. भांडवली जिंदगीवरील घसाऱ्याची व कराची पूर्ण तरतूद करून आणि स्टोअर्स व स्टॉक ह्यांची किंमत अगदीं योग्य दरानें करून, १०% किंवा प्रत्येक भागास १ रु. ह्या दरानें डिव्हिडंड बोर्डानें सुचविलें आहे.

"बाटल्या व टमलरें करणारीं ऑटोमॅटिक यंत्रें आणि त्यास लागणारे मोल्ड ह्यांची खरेदी आपल्या वतीनें पूर्ण झाल्याची वार्ता मला नुकतीच कळली आहे. वर्ष पुरें होण्यापूर्वींच हीं सर्व हातीं येतील. उत्पादन वाढविण्यास, परदेशी मालाच्या तोडीचा माल काढण्यास, खर्चांत बचत करण्यास आणि स्पर्धेस तोंड देण्यास ह्या यंत्रसामुग्रीचा आपणांस उपयोग होणार आहे.

"कामगारांच्या सुखसोईकडे नीट लक्ष दिलें जात आहे आणि त्यांचेशी संबंध आपुलकीचे आहेत. व्यवस्थापकांनीं ह्याबाबत प्रथमपासूनच लक्ष घातलेलें आहे आणि कामगारांनींहि त्याची जाणीव ठेवली आहे. व्यवस्थापक आणि कामगार यांचेमधील सलोख्याबद्दल मी त्या दोघांचेंहि अभिनंदन करतों. हा सलोखा कायम टिकेल असा मला विश्वास वाटतो.

"माझे डायरेक्टर बंधू व कंपनीचे ऑडिटर्स ह्यांचेकडून मला मिळत असलेल्या सहायाबद्दल व सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. कंपनीच्या नोकरवर्गानें कंपनीच्या हिताशीं समरस होऊन केलेल्या कामाचाहि येथें उल्लेख करणें आवश्यक आहे.

"डायरेक्टरांचा रिपोर्ट व ताळेबंद मंजुरीस टाकण्यापूर्वीं भागीदारांस कांहीं सूचना करावयाच्या असल्यास किंवा चार शब्द बोलावयाचे असल्यास त्यांनीं जरूर पुढें यावें, अशी माझी विनंती आहे."


**दि रत्नाकर बँक लिमिटेड.**

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

चेअरमनः—नामदार बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी. डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,२३,६०० |
| खेळतें भांडवल अंदाजें | ३५,००,००० |

—: अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.**

( शेड्यूल्ड बँक ) —:— हेड ऑफिस : पुणें शहर

( एकूण खेळतें भांडवल रु. २ कोटीचे वर )

बँकेतर्फे नवीन लोकोपयोगी व्यवस्था : एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीची स्थापना

—ट्रस्टी कंपनीचें भांडवल—

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल ... | रु. २,५०,००० |
| वसूल झालेलें भांडवल... | रु. १,२५,००० |

—:बँकेच्या शाखा:—

डेक्कन जिमखाना, पुणें, खडकी, मुंबई (फोर्ट), गिरगांव, जळगांव, नागपूर (सिताबर्डी व इतवारी), रत्नागिरी, कोपरगांव, फैजपूर (पे-ऑफिस), सोलापूर, धुळें, चाळिसगांव, हुबळी, नाशिक, कल्याण.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

बँकेच्या व ट्रस्टी कंपनीच्या कामासंबंधीं मॅनेजर यांस भेटावें.

सी. व्ही. जोग
मॅनेजर






## रुपया स्वतंत्र झाला !

१९४८ सालीं ब्रिटन हिंदुस्थानांतून ' चलेजाव ' करणार त्याचें परवापासून पहिलें पाऊलच जणूं काय म्हणून त्यांचा स्टर्लिंग परवापासून प्रथम ब्रिटनची वाट चालूं लागला. रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४० व ४१ कलमाअन्वयें रुपयाचें लग्न स्टर्लिंगशीं बळजबरीनें लावून टाकलेलें होतें. तीं कलमें रद्द करण्याचा ठराव जनाब लियाकत अलीखान यांनी नुकताच मध्यवर्ती मंडळांत मांडला होता तो मान्य करण्यांत आला आहे. पूर्वीच्या राजवटींतल्या सरकारतर्फे असा ठराव पुढें आणण्यांत आला असता तर जनतेला आश्चर्याचा धक्काच बसला असता. रुपयाचा स्टर्लिंगशीं लावलेला पाट कायम राखण्याकरतां आतांपर्यंत ब्रिटननें किती अट्टहास करून हिंदुस्थानची किती नुकसान केलेली आहे, हें वेगळें सांगणें नको. रुपयाचें मोल सोन्यांत ठरलें जावें अशी वेळोवेळीं हिंदुस्थाननें मागणी केलेली असतां, तुम्हांला वेगळें सोनेंच कशाला हवें, आमचा स्टर्लिंग पौंड हा सोनेंच आहे, त्याच्याशींच तुम्हीं मूल्य संबंध ठेवलेला चांगला, असा युक्तिवाद हिंदुस्थानच्या माथी मारण्यांत आला होता. तेव्हां जगाच्या बाजारांत स्टर्लिंगचे मोल फिरेलें तसें रुपयाचें फिरूं लागलें. वास्तविक हिंदुस्थानचा कच्चा माल सगळ्या जगाला हवा. तेव्हां जगाच्या बाजारांत रुपया तेज रहावयाचा. आज डॉलरची अशी तेजी चालू आहे. कारण अमेरिकन माल सर्वांना हवा आहे आणि तेवढ्याकरता सर्वांना डॉलर हवे आहेत. पण रुपयाला दाबून ठेवल्या सेरीज स्वतःला कच्चा माल स्वस्तांत कसा मिळणार ? तेव्हां जुलमानें रुपयाला स्टर्लिंगशीं बांधून टाकला. जगाला रुपया हवा तर प्रथम स्टर्लिंग घ्या मग रुपया मिळेल अशी विनतोड बाजू जगांत करून ठेवली. हिंदुस्थानचा कच्चा माल किफायतींत पदरांत पडून त्याच्या जोरावर स्वतःचा निर्यात व्यापार मागची पंचवीस वर्षे बिनघोर चालूं ठेवून आपला ढोल ब्रिटननें कायम ठेवला. परवाच्या युद्धांत याच जोरावर हिंदुस्थानला धुवून काढून दरिद्री बनवून सोडलें. देशांत रुपयाचे चार आणे झाले पण बाहेर स्वतःपुरतें मात्र पुरेपुर असें माप ठेवलें. म्हणजे ज्या मालाला सध्या युद्धकाळांत एक रुपाया तुम्हीं-आम्ही देतों तेथें ब्रिटन चार आण्यांत कायदेशीर तो माल उचलून घेऊन जाऊं शकत होतें.

पण ब्रिटनच्या दुर्दैवानें आतां परिस्थिति पालटली असून मन मानेल त्याप्रमाणें दंडेली करतां येण्यासारखा काल राहिलेला नाहीं. जागतिक हुंडणावळीची व्यवस्था आतां स्थापन झालेली असून सर्वांनींच तिच्यापुढें मान तुकविणें भाग झालें आहे. प्रत्येक राष्ट्रानें आपल्या विशिष्ट नाण्याबरोबर किती सोनें, हें प्रमाण जागतिक पैसा फंडाला कळविलें पाहिजे. हें स्वातंत्र्य हिंदुस्थानला साहजिकच प्राप्त झालें आहे. तेव्हां एक रुपया म्हणजे अमुक इतका स्टर्लिंग तमुक इतकें सोनें, हा द्राविडि प्राणायाम बंद झाला असून त्रैराशिक असें बसलें आहे कीं जर रुपया म्हणजे इतके सोनें, व एक स्टर्लिंग म्हणजे तितकें सोनें तर रुपया आणि स्टर्लिंग यांचे गणितानें येईल तें प्रमाण. कुठल्याही राष्ट्राच्या नाण्याशीं रुपयाचें असेंच प्रमाण आतां ठरेल. स्टर्लिंगनें 'मम' सांगण्याची जरूर नाहीं.

या नव्या बदलामुळें पुढील कांहीं वर्षांत हिंदुस्थानची खरी पत स्थापन होईल. रुपया मजबूत झालेला आढळून येईल. आतां त्याला आडकाठी फक्त हिंदुस्थानच्या ब्रिटनमध्ये डांबून ठेवलेल्या स्टर्लिंग शिल्का. त्यांची विल्हेवाट कशी काय लागते तेवढीच. स्वतंत्र हिंदुस्थानचा रुपया व्यापाराच्या पाठिंब्यामुळें जगाच्या बाजारांत डॉलरच्या बरोबरीनें मानांत वागेल असा विश्वास बाळगण्यास प्रत्यवाय नाहीं.

## वेस्टमिन्स्टर बँकेची वार्षिक सभा

### बँकेचे चेअरमन, ऑ. रुपर्ट ई. बेकेट, ह्यांनीं घेतलेला आढावा

"निर्गत व्यापारांतील वाढ उत्साहजनक आहे. तीन वर्षांपूर्वी निर्गतीचें प्रमाण १९३८चे मानानें एक तृतीयांशाइतकें होतें; आतां ते १९३८ चे मानानें २०% जास्तच आहे. नागरी जीवनास आवश्यक असलेल्या मालाचे उत्पादनाऐवजी निर्गतीसाठी माल तयार करण्याचें धोरणच ह्या सुस्थितीस कारणीभत आहे. जून १९३९ चे मानानें आता निर्गतीसाठी करावयाच्या उत्पादनांत ५०% अधिक कामगार गुंतलेले आहेत. परंतु, कच्च्या मालाचा तुटवडा, कोळशाचें दुर्भिक्ष्य, वहातुकीच्या अडचणी, इत्यादिबाबत सुधारणा झालेविना आणखी मनुष्यबळाचा निर्गत वाढण्यास उपयोग होणार नाहीं. लोकांना रहावयासाठी अद्याप पुरेशी घरें बांधून झालेलीं नाहींत; अन्नपरिस्थिति आणीबाणीचीच आहे आणि अजन रेशन वाढण्याऐवजी त्यांत कपात होण्याचीच भीति वाटत आहे; अशी निराशाजनक स्थिति आहे. कापड, बूट, इत्यादींचाहि पुरवठा लवकर होण्याचीं चिन्हें नाहींत. कंट्रोलमुळें व्यापारवाढीस अडथळे येत आहेत. उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाचे सुपरिणाम दिसून येण्यास बराच अवधि लागणार आहे. शक्य तितक्या लवकर प्रत्यक्ष सुधारणा घडवणाऱ्या योजनांचीच आज ज्यास्त जरूरी आहे.

" निरुत्साह व काम करण्याकडे दुर्लक्ष यांनीं सर्व समाजास ग्रासून टाकलें आहे आणि स्वयंस्फूर्तीनें काम करण्याची प्रवृत्ति कोठेंहि दिसून येत नाहीं. बहुतेक लोकांची वृत्ति—दुर्दैवानें त्यांत बहुसंख्य तरूणच आहेत— सुरक्षितपणा आणि बिनधोकपणा यांचे दृष्टीनें व्यवहार करण्याची आहे. धाडसीपणा दाबून टाकला जात आहे, आणि सरकारी खातें किंवा सरकार मालकीचा उपक्रम ह्यांचे छत्राचा सर्वजण अवलंब करूं इच्छित आहेत.

" उत्पादन हा आपल्या सर्व प्रश्नांचा गाभा आहे. यंत्रसामुग्रीचा तुटवडा असल्याकारणानें मनुष्यबळावरच आपणास विसंबणें भाग आहे म्हणून कामांत टाळाटाळ न करतां मनापासून तें सतत करणें हाच आपल्या उद्धाराचा मार्ग आहे. त्यासेरीज आपला जात चाललेला आत्मविश्वास आणि स्वाभिमान ह्यांस आपण कायमचे मुकल्यासारखें होऊं."

## लॉइड्स बँकेची वार्षिक सभा

बँकेचे चेअरमन, लॉर्ड बाल्फर, ह्यांनीं घेतलेला आढावा.

" आपल्याकडील चालू व इतर खात्यांत एकूण १ अब्ज, १¼ कोटि पौंड इतकी रक्कम आहे, ही बँकेच्या इतिहासांतील सर्वांत मोठी रक्कम आहे. कर्जें २½ कोटि पौंडांनीं वाढलीं असलीं तरी अद्याप बँकेकडील एकूण ठेवीपैकीं ५८% रक्कम रोख, ट्रेझरी डिपॉझिट रिसीट्स व ट्रेझरी बिलें ह्यांतच ठेवावी लागत आहे.

" उत्पादनांत पुष्कळच वाढ केल्याविना आपणांस आपलें युद्धपूर्व रहाणीचें मान पुनः मिळवितां येणार नाहीं. प्रत्येकानें उत्पादनांत जेवढी भर घालतां येईल तेवढी घातली पाहिजे. युद्धांत अमेरिका व इंग्लंड ह्यांचें सख्य झालें, तें व्यापार वृद्धींतहि जर टिकलें नाहीं आणि अमेरिकेनें जागतिक हितास अनुसरून आपलें धोरण आखलें नाहीं, तर शांततेचा पाया डळमळित झाल्याविना रहाणार नाहीं.' कारखानदार व व्यापारी ह्यांनीं परदेशी जाऊन बाजार पेठांची पहाणी केली पाहिजे. आपली बँक निर्गत व्यापारास सहाय करण्यास सदैव तत्पर आहे."

व्याज-वेजा
+ गोकाक रु. १२ दि. ७-४-४७

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज-वजा
+अपोलो रु. ०-४-० दि. ३१-३-४७

साप्ताहिक बंद भाव +बॉम्बे डाइंग-बोनस शेअर + रु.४० दि.७।४।४७
फिनले रु. १५ दि. २५।४।४७

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार ११।४।४७ | सोमवार १४।४।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६१७ ८; २५२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | | | | २०५५ | २१०२-८ |
| ६२८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा ऑर्डिनरी | ७५ | | | | ३८० | ३८९ |
| ६५; ३६-४ | ०-८-९S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | | | | २४ | २४-१२ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | | | | ३४-६ | ३३-११ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| ३२७७८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | | | | २०७०+ | १०८७-८×R |
| ९१८; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | | | ६१५ | ५९० ×R |
| ९९९; ६६० | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | | | ५३० | ५६४ |
| ५६७; ३९८ | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | | | | २७६ | २८२ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | | | | २८७ | २९४ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | | | २७६+ | २८५ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | | | | २८५ | ३९४ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | | | ४-३+ | ४-२-६ |
| २९-१; १६-१२ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | | | १४-७ | १५-७ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-३-० | | ,, डिफर्ड्स | १ | | | | ३-२ | ३-४ |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | | | ५५२-८ | ५७२-८ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | | | १७१-८ | १७४-८ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | | | २४० | २४३ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | | | ४४० | ४४१-४ |
| ६०-१० ३६-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | | | | ३०-१४ | ३१-१२ |

गुरुवार दि. २३-३-४७ पासून बाजार बंद होता, तो शुक्रवार ता. ११-४-४७ ला उघडला. अद्यापि टाटा डिफर्ड, टा. ऑर्डिनरी आणि डाईंग या शेअरवर नियंत्रण आहे. [ × R नवीन शेअर विरहित

## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., पुणें ५ )

शेअर बाजार गेल्या शुक्रवारीं खुला झाल्याबरोबर पूर्वीचा बंद भाव २२७० त्याच्या एकदम खालीं २१९० वर उघडून २०१० पर्यंत घसरून २०५५ ला बंद झाला. हें घडणार होतेंच; कृत्रिम बंधनामुळें इतके दिवसांची तुंबून राहिलेली बेचाण येणारच होती. याच प्रमाणांत बाकीचे भाव पडले. इतके भाव खालीं आल्यानंतर गुंतविणारांचा टेका येण्यास हरकत नाहीं. पण सध्या राजकीय मनू पालटला असल्याकारणानें आणि उद्योगधंद्यासंबंधानें कुठलेंच निश्चित सरकारी धोरण दिसत नसल्याकारणानें आणि देशांत अराजक माजलें असल्याकारणानें तो येत नाहीं असें दिसतें. मागच्या वर्षांत सटोडियांनी कांहींही केलेलें असलें तरी त्याची भरपाई आतां पुरेपूर झाली आहे असें आम्हास वाटतें. आपले उद्योगधंदे जागच्या जागीच आहेत तसेच उलट मजबूत पायावर उभे आहेत, कुठल्याही नामांकित कंपनीच्या गंगाजळींत स्पृहणीय वाढ झालेली दिसून येईल. सरकारला राष्ट्रीय करण करणें पुढची पांच वर्षे तरी कठीण दिसतें. नवीन पद्धतीनें बसविलेला कर जादा नफ्यावरील करापेक्षां खात्रीनें जाचक नाहीं. जरी वस्तूंचे बाजारभाव खालीं आले तरी कच्च्या मालाचे भावही खालीं येतील. तेव्हां नफ्यांत एकदम मोठी घट येईल असें दिसत नाहीं. आणि जी कांहीं येण्याची शक्यता आहे त्या दृष्टीनें आज शेअरचे भाव खालती येऊन पडलेच आहेत. गुंतविणाराला आतां सहा ते आठ टके मिळतील.तेव्हां आम्ही मोठी तेजी होणार म्हणून म्हणत नसलों तरी-तुरळक टाटा स्टील, ऑर्डिनरी, कोहिनूर, डाईंग, गोकाक, शिंद्या, स्टील कॉर्पोरेशन आणि चांगले प्रेफरन्स शेअर्स गुंतविण्याच्या दृष्टीनें उचलण्यास हरकत दिसत नाहीं.

**ब्रह्मदेशांतील चलन** — ब्रह्मदेशांतील चलनविषयक कारभार एका बोर्डाकडे सोपविण्यांत आलेला असून रिझर्व्ह बँकेजवळ असलेलें २५ कोटी रुपयांचें चलन या नवीन बोर्डाच्या हवालीं करण्यांत आलें आहे. या २५ कोटींची वजावट ब्रह्मदेशाच्या इंग्लंडमधील पौंडांतून करण्यांत येणार आहे.

**अखिल भारतीय कारखानदार संघटना**—या संघटनेच्या वार्षिक परिषदेचें उद्घाटन पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं केलें. ही परिषद मुंबईला भरणार होती. परंतु आतां ती ता. १४-१५ एप्रिल रोजीं दिल्ली येथें भरविण्यांत आली.

-सर्व प्रांतांतील-
सुती - गरम - रेशमी
---खादीचा उत्तम संच---

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

पुणें-प्रदर्शनांतील स्टॉल नं. १४० पहाण्यास विसरूं नका.

## जर्मन उद्योगधंद्यांचें तज्ज्ञांकरवी सूक्ष्म निरीक्षण

जर्मन उद्योगधंद्यांसंबंधीं उत्कृष्ट तपशीलवार माहिती मित्रराष्ट्रांचीं लष्करी व इतर खातीं आणि संशोधन संस्था ह्यांनीं जमा केली आहे. त्यांत युद्धकालांतील कारखाने व त्यांची कार्यपद्धति ह्यांचीहि माहिती आहे. ब्रिटिश सरकारनें रिपोर्टांचे स्वरूपांत ती प्रसिद्ध केली आहे. हिंदुस्थानांत सरकारच्या पेटंट कचेरींकडे अशा रिपोर्टांच्या प्रती आल्याअसून लोकांना त्या पहावयास मिळूं शकतील. लॉर्ड रे महाराष्ट्र इंडस्ट्रियल म्यूझियमकडे त्यांपैकीं आणखी १३ रिपोर्ट पाठण्यांत आले आहेत त्यांची यादी खालीं दिली आहे. ती हितसंबंधीं लोकांना उपयुक्त वाटेल.

### रिपोर्टांची यादी

(1) Technical Index of Reports on German Industry.
(2) Focke Wulf Photo Reproduction Department Bad Eilsen.
(3) Film Production and Methods Agfa Film Fabrik Plant, Wolfen.
(4) Manufacture of Hydroquinone—I. G. Farbenindustrie, Wolfen.
(5) Agfa Film Factory Wolfen.
(6) I. G. Farben, Agfa Subsidiary Wolfen.
(7) I. G. Photopaper Fabrik (Agfa) Leverkusen, near Cologne.
(8) German Photographic Film Base Industry.
(9) Agfa Colour.
(10) Light Sensitive Reproduction Materials.
(11) The Agfacolour Negative-Positive Method for professional Motion Pictures.
(12) Photo-Mapping and Map Reproduction.
(13) Ozalid Light-Sensitive Materials Kalle & Co Wiesbaden-Biebrich ( I. G. Farbenindustrie A. G. )

## नव्या भांडवल उभारणीस परवानगी

| कंपनी | धंदा | मान्यता दिलेलें भांडवल ( रु. ) | शेरा |
|---|---|---|---|
| प्रताप टेक्स्टाइल मिल्स लि. नाभा | सुताची व कापडाची गिरणी | ५०,००,००० | नवी कंपनी |
| महमदी स्टीमशिप कं. लि. सिंध | आगबोट वहातुक | ५,००,००,००० | नवी कंपनी |
| एक्सेल प्रॉडक्टस लि. मुंबई | तेल व साबण | १६,००,००० | नवी कंपनी |
| लिंक केमिकल्स लि, मद्रास | सोडा ॲश | १,००,००,००० | नवी कंपनी |
| बिजली लि., कलकत्ता | विजेचें सामान | ३,००,००,००० | नवी कंपनी |
| हिंदुस्थान स्टीम नॅव्हिगेशन कं. लि., दिल्ली | आगबोट वहातुक व बांधणी | १२,००,००,००० | नवी कंपनी |
| कराची स्टीम नॅव्हि. कं. लि., कराची | आगबोट वहातुक | २५,००,००० | नवी कंपनी |
| मलबार स्टीमशिप कं. लि., मुंबई | आगबोट वहातुक | ७२,२२,१२० | जु. कं. चें नवें भांडवल |
| इंडियन व्हिटॅमिन कॉर्पोरेशन लि. सिकंदराबाद | यीस्ट | ५०,००,००० | नवी कंपनी |
| पार्शी डेअरी फार्म लि., मुंबई | डेअरी | १२,५०,००० | नवी कंपनी |
| ब्रुक बॉंड एस्टेट्स, कलकत्ता | चहा | ५०,००,००० | नवी कंपनी |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

**शेतकऱ्यांची प्रांतिक बँक**

म्हणजेच

**बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११

—मुख्य कचेरी—

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग

९, बँक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५०

**खेळतें भांडवल रु. ७,३१,००,०००**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे

ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

**दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली**

स्थापना सन १९२७

अधिकृत भांडवल २,००,००० दोन लक्ष रुपयें
भरलेलें भांडवल ७१,२२० रुपये
रिझर्व्ह व इतर फंड १,००,००० चे वर रुपये
खेळतें भांडवल ९,००,००० रुपये

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः मालदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीद्ची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

—ना. पां. ठाणेदार

मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनी छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनी 'दुर्गाधिवास,' ८२ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.